केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नियोजन विभागातील सहायक माहिती अधिकार, माहिती अधिकारी व अपीलीय अधिका-यांच्या सुधारित नियुक्त्या.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय, क्र. इपीडी-३७१०/प्र.क्र.१०६/का.१४२१
मंत्रालय, मुंबई
दिनांक : १८ डिसेंबर, २०१०.

वाचा :- १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. इपीडी-३७०९/प्र.क्र.२८१/का.१४२१, दि.२२ सप्टेंबर, २००९.
२) कार्यालयीन आदेश क्रमांक इपीडी-३७१०/प्र.क्र.१०६/का.१४२१, दि. १७ मार्च, २०१०

शासन निर्णय :-

संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक : इपीडी-३७०९/प्र.क्र.२८१/का.१४२१, दिनांक २२.९.२००९ तसेच कार्यालयीन आदेश दि. १७ मार्च, २०१० अधिक्रमित करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (२) नुसार माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता या अधिनियमातील तरतुदी अंतर्गत नागरीकांकडून येणारे अर्ज, अपिलीय अर्ज, स्वीकारुन ते संबंधित राज्य शासकीय माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्याकरीता **कक्ष अधिकारी, का.१४२३(नोंदणी शाखा) यांची सहायक माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती कायम ठेवण्यात येत आहे.** नोंदणी कार्यासनाने माहितीच्या अधिकारांतर्गत येणारे अर्ज स्विकारुन त्यांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत घेवून ते संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे पाठवावेत.

३. सोबतच्या प्रपत्र -"अ"नुसार विभागातील उक्त अधिनियमाच्या कलम ५(१) नुसार संबंधित अवर सचिवांना राज्य शासकीय माहिती अधिकारी व उक्त अधिनियमाच्या कलम १९ नुसार संबंधित सह/उप सचिवांना **"अपिलीय अधिकारी "** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( यु. ल. वाघमारे )
सह सचिव, नियोजन विभाग.

प्रति,

*१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
*२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.उप मुख्यमत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. सर्व मा.मंत्री आणि मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई.

७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई.
८. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, यांचे कार्यालय, मुंबई.
*९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*१०. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय (विधान सभा), मुंबई.
*११. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), मुंबई.
*१२. राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई.
१३. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
१४. सर्व मंत्रालयीन विभाग.
१५. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-५
१६. मुख्य अभियंता व सह सचिव, रोहया, नियोजन विभाग
१७. विभागातील सर्व अधिकारी, नियोजन विभाग.
१८. सहायक माहिती अधिकारी, का.१४२३ (नोंदणी शाखा), नियोजन विभाग.
१९. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२०. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागूपर.
२१. सदस्य सचिव, सर्व वैधानिक विकास मंडळे.
२२. सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन), सर्व विभागीय आयुक्तांचे कार्यालय.
२३. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी.
२४. कक्ष अधिकारी, का.१४२३, नियोजन विभाग.
२५. निवड नस्ती, का.१४२१, नियोजन विभाग.

* प्रत पत्राने रवाना.